निवडक



लोणावळा : येथील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये आयोजित स्नेहसंमेलना निमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी.

# जिल्हा परिषद शाळेत शिकणारा विद्यार्थी 'रोल मॉडेल' ठरावा - मिस्त्री

**लोणावळा, दि. १४ (प्रतिनिधी)-** कुणे गाव जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या एकाही मुलाला भविष्यात शारीरिक कष्टाच्या मजुरीचे काम करावे लागता कामा नये, त्याने प्रतिष्ठा असलेल्या व्यवसायात जाऊन ताठ मानेने काम करावे व साऱ्या समाजासाठी व आपल्या आसपासच्या परिसरासाठी एक 'रोल मॉडेल' म्हणून पुढे यावे, असा आमचा प्रयत्न असून हे घडवून आणणे ही माझी जबाबदारी आहे, असे प्रतिपादन डेला उद्योगसमूहाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक जिमी मिस्त्री यांनी केले. कुणे गाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात जिमी मिस्त्री हे बोलत होते. सदर शाळा ही डेला उद्योग समुहाने दत्तक घेतली असून याठिकाणी शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारले आहे. या शाळेत या परिसरातील वंचित समाजातील १६० विद्यार्थी शिक्षण घेत असून या विद्यार्थ्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणे हे 'व्हिजन' घेऊन ही शाळा चालविली जात आहे. स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्या अलका धानिवले, कुसुम काशीकर, पंचायत समिती सदस्य महादू उघडे, दत्तात्रय गवळी, नगरसेवक निखिल गवळी, कुणे गावचे सरपंच संदीप जाणिरे, उपसरपंच संजय ढाकोळ यांच्यासह मोठ्या संख्येने मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.